**ओळखपत्र वाटप योजना:-**

महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास अधिनियम १९७१ अन्वये शासनाने १ जानेवारी १९९५ पर्यत अस्तीवात असलेल्या झोपडपट्टयातील झोपडीधारकांना ओळखपत्र (फोटोपास) देण्याबाबत कार्यवाही ९ प्रभाग समितीमध्ये सहा.आयुक्त मार्फत केली जाते.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकुण २१० झोपडपट्टया असुन सन २००१ च्य जनगणनेप्रमाणे झोपडपट्टीतील झोपडीधारकांची लोकसंख्या ४५३४२८ इतकी आहे. ठाणे महापालिका ठराव क्र १६५ दि. १६/०७/२००२ अन्वये फोटोपास योजनेच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ प्रभाग समिती स्तरावर सहा.आयुक्त यांच्या अधिपत्याखाली समाज विकास विभागाने प्रभाग समिती निहाय कर्मचा-यांची नियुक्ती केलेली आहे. शासन निर्णय क्र / गवसु / १२२० / प्र.क्र २०४ (१) झोपसू -१ दि. ११ जुलै २००१ व सुधारीत धोरण १ जाने १९९५ पर्यत अस्तीवात असलेल्या झोपडपट्टीतील झ ोपडीधारकांनी ओळखपत्र देण्याबाबत शासनाचे सुधारीत धोरण शासन निर्णय क्र / गवसु -१२२० / प्र.क्र ३६४ (२) / झ ोपसु -१ दि. ०३ मे २००३ नूसार फोटोपास देण्याची कार्यवाही सुरु आहे.

ठाणे महानगरपालिका अंतर्गत समाज विकास विभाग हा स्वतंत्र विभाग जिल्हाधिकारी कार्यालयाकडील तहसिलदार (स्लम) विभाग सन २००१ मध्ये हस्तांतरीत करण्यात आला असुन ठामपा क्षेत्रातील २१० झोपडयामध्ये वास्तव्य करणारे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांना समाज विकास विभागाकडुन वेगवेगळया उपक्रम कार्यक्रमाद्वारे गोर गरीबांचे रहाणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न महापालिका अधिनियम १९४९ नुसार मा.आयुक्त महोदयांच्या अधिपत्याखाली या विभागाच्या खालील यंत्रणेमार्फत विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते.

**उपआयुक्त**

↓

**समाज विकास अधिकारी**

↓

**उपसमाज विकास अधिकारी**

↓

**पर्यवेक्षक**

| | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| **भुमपाक** | **लिपीक** |
| ↓ | ↓ |
| **प्रकल्प संचालक** | **शिपाई** |
| ↓ | ↓ |
| **समुह संघटक** | **बिगारी** |

कामाची व्यापकता व कालमर्यादा विचारात घेवुन वरील यंत्रणा मुख्यालयात उपलब्ध असुन प्रशासकीय कामकाजाच्या सोईसाठी विविध योजनांची अंमलबजावणी उदा. झोपडीधारकांना फोटोपास वाटप, महिला व बालकल्याण योजना मा. उपआयुक्त (सविवि) यांच्या नियंत्रणाखाली ओळखपत्र योजना प्रत्यक्ष ओळखपत्र तयार करणे ,वाटप करणा-या यंत्रणेसाठी शासन निर्णय क्र गवसु / १२२० प्र.क्र ३६४ (२) झोपसु -१ दि ३ मे २००३ नुसार नमुद केल्या प्रमाणे ०१.०१.१९९५ पूर्वीचे पात्र असणा-या झोपडीधारकांकडुन खालीलप्रमाणे एकत्रित शुल्क आकारण्यात येत

| अ.क्र | ओळखपत्राचा प्रकार | क्षेत्र | ओळखपत्र शुल्क | नुकसान भरपाई (एकत्रित) दरमहा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | निवासी वापर | २२५चौ.फु. पर्यत | २००/- | रुपये २५/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी पैसे ०.२५ प्रती चौ.फु. दरमहा |
| २. | संयुक्त वापर | २२५ चौ.फु पर्यत | ६००/- | रुपये ५०/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी पैसे ०.३८ प्रती चौ.फु. दरमहा |
| ३. | अनिवासी वापर | २२५ चौ.फु पर्यत | ८००/- | रुपये ७५/- | अतिरिक्त क्षेत्रासाठी पैसे ०.५० प्रती चौ.फु. दरमहा |
| ४. | सांस्कृतिक साामाजिक धार्मिक व शैक्षणिक | -- | २००/- | दरमहा पैसे १३ प्रती चौ.फु. | |

निवासी ओळखपत्र देताना एकत्रीत सेवाशुल्कांची रक्कम दि. १.१.२००३ पासुन वसुल करण्यात येत आहे. वरील तक्त्यात नमुद केलेले क्षेत्र म्हणजे झोपडीधारकांच्या वापरात असलेले क्षेत्र यामध्ये मजला किंवा पोटमाळा याचा समावेश नाही. ओळखपत्र देताना पात्र झोपडीधारकाला त्याच्या वापरातील क्षेत्रापुरताचा फोटोपास देणेत येणार आहे. पोटमाळा मजला/ माळा यासाठी स्वतंत्र ओळखपत्र देण्यात येणार नाही. ओळखपत्र झोपडीधारकाला देणेचे आधी त्यांची नोंद डिमांड रजिस्टरला करुनच ओळखपत्र वाटप करणेत येते.